माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १३८१/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. युवराज एन. मदनकर, व्दारा- वसुंधरा नगर, पाण्याचे टाकीचे समोर, नागभीड, ता. नागभीड जि. चंद्रपूर | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर |

**सुनावणी दिनांक :- १७.१२.२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १२.०३.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : विहीत मुदतीमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तथा प्रथम अपील घेण्यात आलेली नाही.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८.०९.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७.०९.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : जानेवारी २००४ ते ऑगस्ट २०२१

(4) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १) वर नमूद कालावधीमध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या आदेशाच्या तसेच टिपणीच्या सत्यप्रती. २) नमूद कालावधीमध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रती ३) नमूद कालावधीमध्ये अनुकंपा नियुक्तीबाबत प्राप्त शासन निर्णय, परिपत्रके, मार्गदर्शक तत्वाच्या सत्यप्रती.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक १६.०९.२०२१ रोजी श्री. रविंद्र वाघाडे, वरिष्ठ सहाय्यक, सा.प्र.वि.जि.प. चंद्रपूर यांचेकडे कलम ५ (४) अन्वये आपणास

मानीव जन माहिती अधिकारी समजण्यात येऊ शकेल याची नोंद घ्यावी, तसेच त्याची प्रतिलीपी अपिलार्थी यांना पाठविण्यात आलेली आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २६.१०.२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७.१०.२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : विहीत मुदतीमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

(४)**अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी सुचना जारी केल्या मात्र प्रत्यक्षात कोणतीही सुनावणी घेतल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असुन, विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वतीने जन माहिती अधिकारी उपस्थित आहे.

२. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये विहित मुदतीमध्ये माहीती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच प्रथम अपील सुनावणी घेण्यात आली नसल्याचा आक्षेप नोंदविलेला असल्याचे आज सुनावणी दरम्यान नमुद केले.

३. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक १६.०९.२०२१ रोजी श्री. रविंद्र वाघाडे, वरिष्ठ सहाय्यक, सा.प्र.वि.जि.प. चंद्रपूर यांचेकडे कलम ५ (४) अन्वये आपणास मानीव जन माहिती अधिकारी समजण्यात येऊ शकेल याची नोंद घ्यावी. तसेच व.सहा. तथा मानिव जन मानिव अधिकारी सा.प्र.वि.जि.प. चंद्रपूर यांनी दिनांक २३.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, सदर माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने उपलब्ध माहितीचे अवलोकन करण्यास आपण दिनांक ०५.१०.२०२१ रोजी कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित राहून त्यापैकी आपणास आवश्यक असलेल्या माहितीची निवड करावी व आवश्यक माहितीचे शुल्क भरुन माहितीचे पृष्ठ प्राप्त करुन घ्यावे, असे अपिलार्थीस कळविले असल्याचे कागदपत्रांवरुन आढळून येते. त्यानंतर व.सहा. तथा मानिव जन मानिव अधिकारी सा.प्र.वि.जि.प. चंद्रपूर यांनी दिनांक ०५ ऑक्टोबर २०२१ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. चंद्रपूर यांना शुल्काचा भरणा प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल, असे कळविले.

४. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक २५.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण शुल्काचा भरणा केल्यानंतर माहितीचे उपलब्ध असलेले अंदाजे १८१ पृष्ठे आपण आपले अर्जात नमुद केल्याप्रमाणे आपणांस रजिष्टर टपालाने पाठविण्यात येतील, असे कळविले आहे.

५. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे दिसुन येत नाही.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

६. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, अपिलार्थी यांनी अवलोकन केले आहे. कोणती माहिती हवी हे जन माहिती अधिकारीला कळविले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी शुल्क कळविले. ही सर्व कार्यवाही विहित मुदतीत म्हणजे मानीव जन माहिती अधिकारीला अर्ज प्राप्त दिनांक १७.०९.२०२१ रोजी झाल्यास विहित मुदतीत केली आहे.

२. अपिलार्थी यांनी शुल्क भरले नसल्यामुळे प्रथम अपील व द्वितीय अपील दाखलपात्र होत नाही, कारण शुल्क कळविल्यापासुन शुल्क भरणा पर्यंतचा कालावधी अधिनियमातील तरतुदी प्रमाणे वगळणे आवश्यक आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१२.२०२४**

जावक क्रमांक 1001 दिनांक 5 MAR 2025